RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्षे - २ रे ❑ अंक -२१६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि.२४ सप्टेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## तिरुपती लाडू वाद: मंदिरात सफाई, देवाची माफी मागणार; पवन कल्याण करणार ११ दिवस प्रायश्चित्त

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४ तिरुपती**

तिरुमला तिरुपती वेंकटेश्वर बालाजी मंदिरात लाडू प्रसादाच्या वादावरून राजकारण चांगलेच तापल्याचे पाहायला मिळाले. यासंदर्भात भाजपा नेते सुब्रमण्यम स्वामी यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिकाही दाखल केली आहे. या वादाच्या पार्श्वभूमीवर तिरुपती मंदिराचे शुद्धीकरण करण्यासाठी चार तासांचे शांती होम पंचगव्य प्रोक्षण करण्यात आले. होमहवन पहाटे ६ वाजता सुरू



झाले आणि १० पर्यंत चालले. भगवान व्यंकटेश्वर यांचे पावित्र्य पुन्हा बहाल करण्याच्या उद्देशाने आणि भाविकांच्या मनातील संभ्रम दूर करण्यासाठी हा विधी करण्यात आला. यानंतर आता आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांनी देवाची माफी मागणार असल्याचे म्हटले आहे.

आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री आणि प्रसिद्ध अभिनेते पवन कल्याण यांनी या वादाप्रकरणी ११ दिवसांची प्रायश्चित्त करण्याचा निर्णय घेतला आहे. अशा घटना रोखू शकलो नाही, याची खंत वाटते, असे पवन कल्याण यांनी म्हटले आहे. पवन कल्याण यांनी विजयवाडा येथील दुर्गा मल्लेश्वर स्वामी मंदिरात स्वच्छता, साफ सफाई केली. पवन कल्याण ०१ ऑक्टोबरपर्यंत प्रायश्चित घेणार आहेत. यानंतर ते तिरुपती बालाजी व्यंकटेश मंदिरात जाऊन देवाकडे क्षमा मागणार आहेत.

## बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरण

### अक्षय शिंदेचा चकमकीत मृत्यू कसा झाला? पोलिसांनी सांगितला घटनाक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४ बदलापूर**

बदलापूरमधील लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेचा पोलीस चकमकीत मृत्यू झाला. अक्षय शिंदे याला पोलीस चौकशीसाठी घेऊन जात असताना त्याने पोलिसांकडील बंदूक हिसकावून घेत पोलिसांवर गोळीबार केल्याची घटना २३ सप्टेंबर रोजी घडली. यामध्ये एक पोलीस अधिकारी जखमी झाले. अक्षय शिंदे याने केलेल्या गोळीबारानंतर प्रत्युत्तरादाखल पोलिसांनीही गोळीबार केला. पोलिसांच्या गोळीबारात आरोपी अक्षय शिंदेचा मृत्यू झाला. या



घटनेनंतर आता ठाणे पोलिसांनी पत्रकार परिषद घेत नेमकं काय घडलं होतं? यासंदर्भातील सविस्तर माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेश साळवी यांनी दिली आहे.

पोलीस निरीक्षक शैलेश साळवी यांनी पोलिसांच्या चकमकीत अक्षय शिंदेच्या मृत्यू प्रकरणासंदर्भात माहिती देताना सांगितलं की, जी घटना घडली, त्या घटनेची प्राथमिक अशी आहे की, बदलापूर पोलीस ठाण्यात बदलापूर येथील दोन चिमुरड्या विद्यार्थींनीवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणाचा गुन्हा अक्षय शिंदेवर दाखल होता. तसेच अक्षय शिंदेवर आणखी एक गुन्हा पोलीस ठाण्यात दाखल होता. अक्षय शिंदे याच्या पत्नीने त्याच्याविरोधात गुन्हा दाखल केला होता. अक्षय शिंदेच्या पत्नीने दाखल केलेल्या गुन्ह्याचा तपास पोलीस करत होते. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी पोलिसांनी न्यायालयाची ट्रान्सफर ऑर्डर घेऊन कायदेशीर रित्या सदर आरोपीचा ताबा तळोजा कारागृहामधून घेतला होता. त्यानंतर पोलीस अक्षय शिंदेला घेऊन जात असताना सदर आरोपीने पोलिसाची बंदूक हिसकावून घेऊन पोलिसांवर जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न केला, अशी माहिती पोलिसांनी दिली.

## शरद पवार, उद्धव ठाकरे ओबीसींसोबत नाहीत हे स्पष्ट झालं; प्रकाश आंबेडकरांचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४पुणे**

शरद पवारांच्या राष्ट्रवादीने, उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेने ते ओबीसींसोबत नाहीत ही भूमिका स्पष्ट केलीय. ओबीसींचे किमान १०० आमदार विधानसभेत निवडून यायला हवेत अन्यथा ओबीसी आरक्षण धोक्यात आहे असा आरोप वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे.

पुण्यात पत्रकारांशी बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, शरद पवार हे जरांगे पाटील यांच्यासोबत आहे. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळालं पाहिजे या जरांगेंच्या मागणीला पवारांचा पूर्णपणे पाठिंबा आहे. त्यासाठी ते प्रयत्नशील



आहे. विधानसभेच्या निवडणुकीनंतर ते प्रयत्न करतील. ओबीसीचे आरक्षण ज्या तत्वांवर सुप्रीम कोर्टात थांबवण्यात आले आहे. महाराष्ट्रातील ओबीसी इम्पिरियल डेटा नसल्याने शिक्षण, नोकरीतील ओबीसी आरक्षणाला स्थगिती विधानसभेच्या माध्यमातून देतील असा आमचा अंदाज आहे असं त्यांनी सांगितले.

त्याशिवाय आरक्षण वाचवायचं आहे का हे ओबीसींनी ठरवले पाहिजे. जर आरक्षण वाचवायचे असेल तर किमान १०० ओबीसी आमदार या विधानसभेत निवडून आले पाहिजेत. शरद पवारांच्या राष्ट्रवादीने, उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेने ते ओबीसींसोबत नाहीत ही भूमिका स्पष्ट केलीय. मध्यंतरी उद्धव ठाकरेंनी मराठ्यांना केंद्राकडून टक्केवारी वाढवून घ्या आणि ओबीसीतून आरक्षण मिळवा असं म्हटलं होते. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देऊ नये ही ओबीसींची मागणी त्यांना मान्य नाही. वंचित बहुजन आघाडी ओबीसींसोबत आहे. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देऊ नये या मागणीला आमचा पूर्ण पाठिंबा आहे असं प्रकाश आंबेडकरांनी स्पष्ट केले.

**एन्काउंटर प्रकरणी सरकारने खुलासा करावा**

दरम्यान, बदलापूर प्रकरणातील आरोपीनं बंदूक हिसकावली, ३ गोळ्या झाडल्या त्यात एक पोलीस जखमी झाल्याची माहिती आहे. संशयाचं वातावरण दूर करण्यासाठी शासनाने ज्या पोलिसाला गोळीबार केला त्याचा मेडिकल रिपोर्ट सार्वजनिक करावा. जेणेकरून मांडीला गोळी लागली म्हणजे नेमकं कुठे लागली हे समोर आणावे. त्यातून या एन्काउंटरबाबत जे काही चर्चा, संशयास्पद गोष्टी समोर येतायेत, त्याला पूर्णविराम लागेल. नेमकं आरोपीला कुठे घेऊन जात होते, याचाही खुलासा पोलिसांकडून किंवा शासनाकडून आला पाहिजे. जर खुलासा केला नाही तर कुणाला तरी वाचवण्यासाठी शासनाने हा बळी दिलाय का असं लोकांना वाटेल. त्यामुळे संशयाच्या भोवऱ्यात न अडकता शासनाने वस्तूस्थिती मांडावी अशी मागणी प्रकाश आंबेडकरांनी सरकारकडे केली.


## अमित शहा विदर्भात, नितीन गडकरी जम्मू-काश्मीरमध्ये

### विदर्भातील विधानसभा मतदारसंघाच्या आढावा बैठकीत गैरहजरीमुळे चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४ नागपूर**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले आहेत. नागपूर येथे विदर्भातील विधानसभा मतदारसंघांचा ते आढावा घेत आहेत. मात्र, त्यांच्या या आढावा बैठकीला केंद्रीय मंत्री आणि भाजपचे महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते नितीन गडकरी उपस्थित राहणार नाहीत. विदर्भातील बैठकीलाच नितीन गडकरी यांची अनुपस्थिती आता चर्चेचा विषय ठरली आहे. त्यामुळे नितीन गडकरी यांना मुद्दाम विधानसभा निवडणुकीपासून दूर ठेवले जात आहे का? असा प्रश्न उपस्थित होतोय.

यासंदर्भात भाजपच्या वतीने देखील स्पष्टीकरण देण्यात आले आहे. नितीन गडकरी हे जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीसाठी प्रचार दौऱ्यावर जात आहेत. नितीन गडकरी यांचा जम्मू-काश्मीरमधील निवडणूक प्रचाराचा नियोजित दौरा आहे. त्यामुळे ते या बैठकीला



उपस्थित नसल्याची माहिती भाजपच्या वतीने देण्यात आली आहे. मात्र केंद्रीय गृहमंत्र्यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या महत्त्वाच्या बैठकीलाच विदर्भातील महत्त्वाचा नेता उपस्थित नसल्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत.

**जागा वाटपाबरोबरच उमेदवारांच्या निवडीबाबत देखील निर्णय**

लोकसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्रात भाजपला अपेक्षित यश मिळाले नाही. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्ष सावध भूमिका घेत आहे. महायुतीच्या जागा वाटपाची चर्चा देखील तातडीने आणि लवकर करण्याच्या हालचाली सध्या सुरू आहेत. त्यातच त्याआधीच भाजप पक्षाच्या वतीने उमेदवारांच्या नावाची चाचपणी सुरू करण्यात आली आहे. अमित शहा यांच्या उपस्थितीत जागा वाटपाबरोबरच उमेदवारांच्या निवडीबाबत देखील काही महत्त्वाचे निर्णय होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे अमित शहा यांच्या या बैठकीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

**१५०० पदाधिकारी उपस्थित राहणार**

विदर्भात आयोजित या बैठकीला भारतीय जनता पक्षाचे सुमारे १५०० पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. या बैठकीमध्ये अमित शहा विदर्भातील संपूर्ण विधानसभा मतदारसंघाचा आढावा घेणार आहेत. सुरेश भट सभागृह ही बैठक आयोजित करण्यात आली आहे. त्यामुळे अमित शहांच्या दौऱ्यानिमित्त नागपूर मध्ये मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त लावण्यात आला आहे. तसेच सुरेश भट सभागृहाच्या बाहेर देखील पोलिसांचा मोठा फौजफाटा दिसत आहे.

## गोळ्या घालून खूपच सहज मरण दिलं, तुडवून मारायला पाहिजे होतं : उदयनराजे

**विदर्भ प्रजासत्ताक दि. २४ कोल्हापूर**

अक्षय शिंदे याच्या एन्काऊंटरवरून विरोधी पक्षाने सरकारला धारेवर धरलंय. शाळा प्रशासन, पोलीस आणि सरकार या तीन घटकांवर विरोधी पक्षाने निशाणा साधलाय. शाळा प्रशासनाला पाठिशी घालण्यासाठी एन्काऊंटर घडवून आणला असा गंभीर आरोप करण्यात




येतोय. तर दुसरीकडे साताऱ्याचे खासदार उदयनराजे भोसले यांनी याबाबत आपली बेधडक भूमिका मांडली आहे. अशा गुन्हेगारांना गोळ्या घालण्यापेक्षा लोकांच्यात सोडून तुडवून मारले पाहिजे, असे खासदार उदयनराजे म्हणाले.

खासदार उदयनराजे म्हणाले, सत्ताधारी विरोधक मला काही घेणदेणे नाही. सत्ताधारी असू दे किंवा विरोधक जे कोणी असू दे यांच्या कुटुंबासोबत हा प्रसंग घडला असता तर काय केले असते? बोलले असते का? अत्याचार झालेल्या मुलीच्या कुटुंबाला ज्या परिस्थितीला सामोरे जावे लागते, त्या कुटुंबाच्या जागेवर मी स्वत:ला ठेवून मी बोलत असतो. गोळ्या घालून मारणे हे अतिशय सहज झाले. अशा लोकांना जनतेत सोडले पाहिजे. जनतेने त्यांना तुडवून मारले पाहिजे.

## गडचिरोलीत गुन्हे दाखल असलेला नक्षलवादी छत्तीसगडमध्ये ठार

### २५ लाखांचे बक्षीस, पीएसआयच्या हत्येत होता सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४ गडचिरोली**

महाराष्ट्र-छत्तीसगड राज्याच्या सीमेवर सोमवारी छत्तीसगडच्या सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत गडचिरोली जिल्ह्यात सक्रिय असलेला व २५ लाख रुपयांचे बक्षीस असलेला जहाल नक्षलवादी रूपेश मडावी हा ठार झाला आहे. त्याची ओळख पोलिसांनी पटवली आहे.



छत्तीसगड राज्याच्या सुरक्षा दलांमार्फत अबूजमाड जंगल परिसरात सोमवारी नक्षल शोध मोहीम राबवली जात होती. दरम्यान नक्षलवादी व सुरक्षा जवान यांच्यात चकमक उडाली. यात तीन नक्षलवादी ठार झाले होते. यातील पुरुष नक्षलवादी रूपेश मडावी याची ओळख पटली आहे. गेली वीस वर्षे गडचिरोली जिल्ह्याच्या नक्षलवादी संघटनेत रूपेश मडावी हा कार्यरत होता. तो माओवाद्यांच्या दंडकारण्य झोनल समितीचा सदस्य आणि कंपनी क्रमांक १० चार कमांडर होता. त्याच्यावर ७० पेक्षा जास्त गुन्हे दाखल आहेत. पोलिस उपनिरीक्षक वनमाने यांच्यासह काही पोलिस जवानांच्या हत्येत तो गुन्हेगार आहे. त्याच्याविरोधात दहापेक्षा जास्त हत्या व जाळपोळीचे गुन्हे दाखल आहेत.

## मध्य प्रदेशमध्ये ट्रकखाली आला ऑटो; ७ जणांचा मृत्यू, ४ जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४ दमोह**

मध्य प्रदेशातील दमोहमध्ये भीषण अपघात झाला आहे. ऑटो आणि ट्रकमध्ये जोरदार धडक झाली. त्यानंतर ऑटो ट्रकखाली आला . या अपघातात ७ जणांचा मृत्यू झाला आहे. चार जण जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी रुग्णवाहिकेतून रुग्णालयात दाखल करण्यात आले



आहे. कटनी रोडवर हा अपघात झाला. माहिती मिळताच जिल्हाधिकारी (डीएम) आणि एसपीसह प्रशासकीय अधिकारीही घटनास्थळी पोहोचले.

घटनास्थळी उपस्थित असलेल्या एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितलं की, सर्व जखमी प्रवाशांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. या अपघातात ट्रक चालकही जखमी झाला असून, त्याच्यावरही रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ट्रक चालक दारूच्या नशेत होता की नाही याची अद्याप पुष्टी झालेली नाही. जखमींची ओळख पटलेली नाही कारण ते सध्या बोलण्याच्या स्थितीत नाहीत.

पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, घटनास्थळी तपास केल्यानंतर ते रुग्णालयात जातील. त्यानंतरच पुढील कारवाई केली जाईल. तसेच जखमींच्या कुटुंबियांना फोन घेऊन माहिती दिली जाणार आहे. ते कोठून येत होते, याचाही शोध घेतला जाईल. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## संपादकीय ......

# मुख्यमंत्री पदासासाठी रस्सी खेच

महाराष्ट्रातील विधानसभेची निवडणूक जसजशी जवळ येत आहे, तशी महायुती आणि महाविकास आघाडीतील इच्छुक नेत्यांकडून मुख्यमंत्रीपदावर दावा सांगण्याची लगीनघाई सुरू झाली आहे. मुख्यमंत्रीपदाचे बाशिंग आपल्याच माथी बांधले जावे असे त्यांना वाटत आहे. त्यासाठी त्यांचे समर्थक जोरदार फिल्डिंग लावून त्यांचे लॉबिंग करीत आहेत. महाराष्ट्राच्या राजकीय पटलाचा विचार केल्यास सध्या प्रामुख्याने महायुती आणि महाविकास आघाडीचे असे मिळून सहा पक्ष स्पर्धेत आहेत.

महायुतीमध्ये भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी तर महाविकास आघाडीत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष हे सहा पक्ष प्रामुख्याने यावेळी सत्तेच्या स्पर्धेत आहेत आणि अर्थातच मुख्यमंत्रीपदाच्या स्पर्धेत आहेत. महाराष्ट्राचा राजकीय पट हा अलीकडच्या काळात फार वेगळ्या पद्धतीने बदललेला आहे. म्हणजे लोकांनी ज्यांना बहुतासाठी मतदान केले तोच पक्ष आणि तीच युती आघाडी सत्तेवर येईल, असे सांगता येत नाही.

कारण निवडणुकीनंतर पक्षांनी जर का आपली भूमिका बदलली तर ज्यांनी अपेक्षा केलेली नव्हती ते सत्तेवर येतात. ज्यांच्या जागा जास्त असतात त्यांना विरोधात बसावे लागते. राज्यात २०१९च्या विधानसभा निवडणुकीनंतर सत्तेचा पट असा विलक्षण प्रकारे बदलेल, मी पुन्हा येईन म्हणणारे मागे पडतील आणि उद्धव ठाकरे हे महाविकास आघाडीची स्थापना करून राज्याचे मुख्यमंत्री बनतील, अशी बाकीच्यांनी सोडा खुद्द त्यांनीही कल्पना केलेली नव्हती.सध्या या प्रमुख सहा पक्षांतील नेत्यांमध्ये मुख्यमंत्रीपदाची जी स्पर्धा सुरू आहे ती पाहिल्यावर राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीनंतर एखादी कल्पनेपलीकडील युती किंवा आघाडी राज्यात सत्तेवर आली आणि अनपेक्षित व्यक्ती मुख्यमंत्री झाली तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. कारण राज्यात आता कुठलाही पक्ष कुठल्याही पक्षासोबत हातमिळवणी करू शकतो हे उद्धव ठाकरे यांनी काँग्रेस, राष्ट्रवादीशी हातमिळवणी करून स्थापन केलेल्या महाविकास आघाडीने सिद्ध केले आहे.

महायुतीचा विचार केला तर त्यातील मुख्य पक्ष असलेल्या भाजपची मोठी कोंडी झाली आहे. शिवसेनेतील नाराजांना हाताशी धरून त्यांनी उद्धव ठाकरे यांचे मुख्यमंत्रीपद आणि महाविकास आघाडीची सत्ता घालवली, पण त्यांची अवस्था सत्ता आली, पण मुख्यमंत्रीपद गेले अशी झाली आहे. त्यांना काळजावर दगड ठेवून एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्रीपद द्यावे लागले, पण हा काळजावरचा दगड कधी उतरणार याची त्यांना चिंता आहे.कारण भाजपच्या नेत्यांना निदान आगामी विधानसभा निवडणुकीनंतर तरी आपला मुख्यमंत्री व्हावा असे वाटत आहे, पण सहनही होत नाही आणि मोकळेपणाने बोलताही येत नाही अशी त्यांची अवस्था झाली आहे. देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री व्हावेत, असे भाजपवाल्यांना वाटत असले तरी स्वत: फडणवीसांनाच स्वत:च्या तोंडून पुढील विधानसभा निवडणूक ही एकनाथराव शिंदे यांच्याच नेतृत्वाखाली लढवण्यात येईल, असे सांगावे लागत आहे.

फडणवीस यांच्या म्हणण्याप्रमाणे शिंदे यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढली आणि महायुतीचा विजय झाला तर शिंदे हेच मुख्यमंत्रीपदाचे दावेदार ठरतील, मग फडणवीसांचे काय होणार ? अशी भाजपची कोंडी झालेली आहे. त्यात पुन्हा मराठा आरक्षणावरून मनोज जरांगे-पाटील यांनी फडणवीसांना टार्गेट केले आहे. त्यामुळे भाजपचे पक्षश्रेष्ठी काय निर्णय घेतात हे पाहणे औत्सुक्याचे आहे. अजित पवार तर फेटा बांधून जोरदार बॅटिंग करीत आहेत, पण भाजप आणि शिंदेंची शिवसेना यांना ते डोईजड झाल्याची स्थिती आहे.

महाविकास आघाडीमध्ये सुरुवातीला उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे पारडे जड होते, पण अलीकडे झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष यांचा स्ट्राईक रेट आणि जिंकून आलेल्या जागा वाढल्यामुळे ठाकरे गटाला आपोआप बॅकफूटवर यावे लागणार आहे, पण हेच त्यांना मान्य करणे मुश्कील होऊन बसले आहे. कारण मुख्यमंत्रीपदासाठी उद्धव ठाकरे यांनी भाजपची साथ सोडून वेगळा मार्ग निवडला होता.

त्यामुळे यावेळी विधानसभा निवडणुकीनंतर उद्धव ठाकरे-२ हे सरकार राज्यात येईल, अशी जोरदार फिल्डिंग ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत लावत आहेत. पुन्हा उद्धव ठाकरे हेच मुख्यमंत्री व्हावेत असे त्यांना वाटत आहे, पण ही अपेक्षा करताना ते आता वेळ बदलली आहे याचा विचार करताना दिसत नाहीत. आता काँग्रेसची परिस्थिती सुधारली आहे. त्यांचे पंतप्रधानपदाचे उमेदवार राहुल गांधी लोकसभेत विरोधी पक्षनेते झाले आहेत. त्यामुळे काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात हे काँग्रेसचा मुख्यमंत्री होईल, असे सांगत आहेत, तर दुसर्या बाजूला भावी महिला मुख्यमंत्री म्हणून सुप्रिया सुळे यांच्या नावाचे फलक बारामतीत झळकत आहेत.नाना पटोले जोरदार तयारी करीत आहेत. काँग्रेस आणि शरद पवार गट दोन्ही बाजूंनी जोर लावत असल्यामुळे उद्धव ठाकरे गटाची अस्वस्थता वाढत आहे. कारण काँग्रेस आणि शरद पवार गट हे नैसर्गिक मित्रपक्ष आहेत. उद्या या दोन पक्षांना बहुमत मिळाले तर ते उद्धव ठाकरे गटाला किती महत्त्व देतील? त्यामुळे संजय राऊत हे उद्धव ठाकरे यांच्या नावाचे जोरदार लॉबिंग करीत असले तरी आता परिस्थिती बदलली आहे. त्यामुळे मुख्यमंत्री कोण होणार हे सध्या गुपितच आहे.

# अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी मदत जाहीर

## अमरावती जिल्ह्याला केवळ ५१.०१ लक्ष



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४ अमरावती** -जून २०२४ ते ऑगस्ट २०२४ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतीपिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी राज्य शासनाने २३७ कोटी ७ लाख १३ हजार रुपयांचा निधी वितरीत करण्यास मंजूरी दिली आहे. मदत, पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन मंत्री अनिल पाटील यांनी ही घोषणा केली. यामुळे बाधित शेतकऱ्यांना योग्य वेळी आर्थिक मदत मिळेल.तर या निधी वाटपात अमरावती जिल्ह्याला सर्वात कमी निधी देण्यात आला आहे.

या निधीमधून शेतकऱ्यांना त्यांच्या नुकसानीच्या प्रमाणानुसार निविष्ठा अनुदान देण्यात येणार आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीपिकांचे नुकसान झाल्यास, केंद्र व राज्य शासनाच्या धोरणांनुसार शेतकऱ्यांना मदत दिली जाते. केंद्राने मान्य केलेल्या नैसर्गिक आपत्तींशिवाय राज्य शासनाने अवेळी पाऊस, अतिवृष्टी, वीज कोसळणे, समुद्राचे उधाण, आकस्मिक आग इत्यादींसारख्या घटना आपत्तीत समाविष्ट करून मदत धोरण निश्चित केले आहे.

अमरावती जिल्ह्यातील सर्वच राजकीय नेते वर्चस्वाच्या लढाईत गुंतल्यामुळे शेतकऱ्यांच्या समस्यांकडे दुर्लक्ष होत असल्याची नाराजी शेतकऱ्यांनी व्यक्त केली. त्यामुळे अमरावती जिल्ह्याला या निधीत सर्वात कमी वाटा मिळाला आहे हे विशेष

**जिल्हानिहाय निधी वितरण**

गडचिरोली जिल्ह्यासाठी ५७७२.४२ लक्ष
वर्धा जिल्ह्यासाठी ३६९१.७६ लक्ष
चंद्रपूर जिल्ह्यासाठी ७४२९.२२ लक्ष
नागपूर जिल्ह्यासाठी १८३६.५६ लक्ष
पुणे जिल्ह्यासाठी ४५८.७१ लक्ष
सातारा जिल्ह्यासाठी ८४.८६ लक्ष
सांगली जिल्ह्यासाठी १११३.२५ लक्ष
अमरावती जिल्ह्यासाठी ५१.०१ लक्ष
अकोला जिल्ह्यासाठी १२९०.१७ लक्ष
यवतमाळ जिल्ह्यासाठी ५४७.९६ लक्ष
बुलढाणा जिल्ह्यासाठी १३५८.६६ लक्ष
वाशिम जिल्ह्यासाठी ७२.५५ लक्ष अशा एकूण २३७ कोटी ७ लाख १३ हजार इतका निधी वितरीत करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.




## शरीरात व्हिटॅमिन 'बी-१२' ची कमतरता होईल कमी! दररोज करा मुगाच्या डाळीचे सेवन

**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक** - व्हिटॅमिन बी-१२ आपल्या शरीरासाठी खूप महत्वाचे आहे. हे केवळ निमियाच्या धोक्यापासून संरक्षण करत नाही तर न्यूरोलॉजिकल आरोग्य देखील चांगले राखते. व्हिटॅमिन बी-१२ च्या कमतरतेमुळे अशक्तपणा, थकवा आणि इतर गंभीर स्मृती समस्या उद्भवू शकतात. पण तुम्हाला माहित आहे का काही पदार्थ बी-१२ ची कमतरता पूर्ण करू शकतात.




व्हिटॅमिन बी-१२ च्या कमतरतेवर मात करण्यासाठी मूग डाळीचे सेवन खूप फायदेशीर आहे. मूग डाळीमध्ये प्रथिने, पोटॅशियम, मॅग्नेशियम, लोह, फॉस्फरस आणि फायबर यांसारखे अनेक आवश्यक पोषक घटक असतात.

मूग डाळ आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे आणि तुमच्या शरीराला आवश्यक ऊर्जा पुरवते. यामध्ये व्हिटॅमिन बी-१२ भरपूर प्रमाणात असते, जे तुमच्या शरीरातील बी-१२ ची कमतरता पूर्ण करण्यास मदत करते.

याशिवाय यामध्ये व्हिटॅमिनबी-१ , बी-३ आणि बी-६ देखील असतात, जे शरीराच्या विविध अवयवांसाठी आणि तुमच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहेत.

मूग डाळीमध्ये व्हिटॅमिन ए देखील असते, जे दृष्टी सुधारण्यास मदत करते. हे रातांधळेपणा टाळते आणि हाडे मजबूत करते.

मूग डाळीमध्ये व्हिटॅमिन सी आढळते, जे तुमची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते. हे संक्रमणाशी लढण्यास मदत करते आणि जखम लवकर बरी होण्यास मदत करते.

तुम्ही तुमच्या सकाळच्या नाश्त्यामध्ये मूग डाळ समाविष्ट करू शकता. तुम्ही हे उकळून, सॅलडमध्ये मिसळून, किंवा स्प्राउट्स बनवून सेवन करू शकता. मूग डाळ पचायलाही सोपी असते आणि त्यामुळे पोटही हलकं वाटतं.

# तूर पिकातील वांझ रोग कशामुळे होतो? कसा कराल बंदोबस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

महाराष्ट्रामध्ये तूर हे महत्वाचे कडधान्य पीक आहे. तूर पिकामध्ये मर, फायटोप्थोरा आणि वांझरोग हे महत्वाचे रोग आहे. बदलत्या वातावरणामुळे व एकच एक पीक घेत असल्यामूळे तूर पीक जैविक व अजैविक घटकाला बळी पडत आहे.

वांझ रोग सतत पाऊस व ढगाळ वातावरणामुळे वांझ रोग येण्याची शक्यता नाकारता येत नाही. वांझ रोग विषाणूजन्य असून त्याचा प्रसार येरीओफाईट माईट म्हणजेच कोळी किडमुळे होतो.

हे कोळी पिजॉन पी मोझॅक या वांझ रोगाच्या विषाणूचा प्रसार करतात. रोगाच्या प्रादुर्भावामुळे तुरीला फुले व शेंगा लागत नाहीत त्यामुळे वांझरोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी कोळी किडीचे वेळीच व्यवस्थापन करणे आवश्यक आहे.

कृषी विशेष

**रोगाची लक्षणे**

- झाडाची उंची, फांद्यांची अपेक्षित वाढ होत नाही, झाड खुजे राहते, पानांचा आकार अनियमित आणि वेडावाकडा होतो.

- पानाच्या टोकावर पिवळे डाग दिसतात, पाने




आकसतात, किडीने पानातील रस शोषल्यामुळे पाने निस्तेज, हिरवी दिसतात.

- रोपावस्थेत प्रादुर्भाव झाल्यानंतर पाने आकाराने लहान असतात, झाडाच्या दोन पेरातील/कांड्यातील अंतर देखील कमी होते, त्यांना अनेक फुटवे फुटतात.

- झाडाची वाढ खुंटते. रोगग्रस्त झाडांना फुले, शेंगा लागत नाही. झाडे झुडपा सारखी होऊन शेवटी हिरवी राहतात.

- बऱ्याच वेळा एकाच झाडाच्या फांद्यावर वांझ रोगाचा प्रादुर्भाव आढळते व इतर फांद्यांना शेंगा देखील लागलेल्या दिसतात अशा झाडांना अर्धवंधत्व किवा अंशतः वांझ रोग म्हणतात. रोगांचा प्रादुर्भाव रोपा अवस्थेपासून ते पक्वतेपर्यंत कधीही आढळून येतो.

**अनुकूल घटक**

- कमाल २५ ते ३० अंश आणि किमान दहा ते पंधरा अंश सेल्सिअस तापमान, जास्त पाऊस व आर्द्रता रोगासाठी पोषक आहे.

- उन्हाळ्यात आपोआप उगवलेल्या तुरीच्या रोपावर किंवा तुरीच्या खोडवा घेतला असल्यास त्या ठिकाणी कोळी किडे आपली उपजिविका करतात आणि पुढील हंगामात वाढणाऱ्या तूर पिकावर वांझ रोग आणण्यास कारणीभूत ठरतात.

**व्यवस्थापन**

१) शेतात व बांधावर असलेली मागील हंगामातील तुरची झाडे काढून टाकावीत, तूर पिकाचा खोडवा घेऊ नये, रोगग्रस्त झाडे दिसतात त्वरीत उपडून त्याना जाळून नष्ट करावीत.

२) आयसीपी ८८६३ म्हणजेच मारूती या वाणावर वांझ रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे शेतकऱ्यांनी या वाणाची पेरणी करण्याचे टाळावे.

३) डायकोफॉल १८.५ ईसी दोन मि.ली. किंवा डाअफेनथिअरॉन ४७.८० टक्के एससी १.२ ग्रॅम किंवा पाण्यात मिसळणारे गंधक ८० डब्ल्यू पी २.५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून प्रादुर्भाव दिसतात त्वरीत फवारणी करावी.

४) केंद्रीय किटकनाशक मंडळाने तुरीवरील कोळी किड्याच्या नियंत्रणासाठी एकाही किटकनाशकाची शिफारस केलेली नाही परंतू वरील किटकनाशके वापरल्यास फायदा निश्चितच होतो.

# सोयाबीनवर पुन्हा पिवळा मोझॅक रोगाचा प्रादुर्भाव, उत्पादनात घट होण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती-** खरीपात अमरावती जिल्ह्यात सर्वाधिक पेरल्या जाणार्या सोयाबीनवर आता पुन्हा एकदा पिवळ्या मोझॅकसह विषाणूजन्यमोझॅकचा प्रादुर्भाव दिसून आलाय. जिल्ह्यांत या रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्याने सोयाबीन उत्पन्नात जवळपास ७५ टक्क्यांची घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकर्यांवर मोठं संकट उभं राहिलंय.अमरावती जिल्ह्यातील १४ हि तालुक्यात सध्या सोयाबीनवर पिवळ्या मोझॅक चा प्रादुर्भाव आहे . मागील वर्षी सोयाबीन शेतकर्यांना पावसाच्या तर्हेमुळे मोठं नुकसान झालं होतं. सरासरीपेक्षा कमी पाऊस आणि नंतर अतिवृष्टीमुळे सोयाबीनवर पिवळा मोझॅक रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने सोयाबीन पिकाने माना टाकल्याचे चित्र होते. परिणामी, अजूनही शेतकर्यांना सोयाबीनला हमीभाव मिळत नसल्याचे चित्र आहे. आता पुन्हा हा रोग पिकावर पसरला तर यंदाही सोयाबीन धोक्यात येण्याची शक्यता आहे.




पहिल्या पेर्यातील सोयाबीनची काढणी ही सुरु आहे तर उशीराने पेरा झालेले सोयाबीन अजूनही शेतातच आहे. खरीप घाईंन आणि रब्बीची पेर दमानं.. अस आजही ग्रामीण भागात म्हटलं जातं..हे कशामुळे ते उशीराने पेरणी करणार्यां शेतकर्यांच्या लक्षात आले आहे. उशीराने पेरणी झालेले सोयाबीन अजूनही वावरातच आहे तर पहिल्या पेर्यातील सोयाबीन हे बाजारात. त्यामुळे मध्यंतरी झालेल्या पावसाचा परिणाम हा या सोयाबीनवर तर झालेलाच आहेच शिवाय आता 'यलो मोझॅक' चा प्रादुर्भाव यावर दिसून येत आहे.

# सोयाबीन सडले, कपाशीवर रोगराई; शेतकरी हवालदिल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४ अमरावती-** गेल्या काही वर्षांपासून नगदी पीक असलेल्या सोयाबीन, कपाशी, उडीद, मूग पिकांवर रोगराईचा प्रकोप वाढला आहे. रोगराई थांबविण्यासाठी महागड्या औषधींच्या फवारणीचा खर्च आणि इतर खर्च यामुळे लागवडी खर्चात वाढ झाली आहे.

बाजारात सोयाबीन, कपाशीला मिळत असलेला अल्प दर यामुळे लागवडीचा खर्चही वसूल होत नसल्याचे चित्र आहे. गेल्या काही वर्षांपासून कपाशी पीक पेरणीकडे पाठ फिरवल्याने सोयाबीन पीक पेरणीकडे शेतकऱ्यांचा कल वाढला. परंतु गेल्या दोन वर्षांपासून अतिवृष्टीने चांगलाच धुमाकुळ घातल्याने जिल्यातील तिवसा,अमरावती, मोर्शी,चांदूरबाजार,नांदगाव , शेतशिवारातील खरीप सोयाबीन, कपाशी, उडीद मुंग पिकांना अतिवृष्टीचा फटका बसल्याने अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील उभी पिके सडली आहेत तर अनेक शेतकऱ्यांच्या



सोयाबीन पिकाला शेंगाच लागल्या नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च वसूल होते की नाही, अशी चिंता शेतकऱ्यांना आहे.

यंदा उत्पादनात घट होण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांचा खर्च वसूल होणार की नाही, अशी चिंता आहे. त्यामुळे साहेब रब्बी, उन्हाळी पिकांची पेरणी कशी करावी, असा सवाल शेतकऱ्यांमधून उपस्थित केला जात आहे. शेतकऱ्यांच्या समस्येकडे लक्ष देऊन विमा भरपाई व आर्थिक मदत करण्याची मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# बदलापुरात फटाके फोडून, मिठाई वाटून जल्लोष; एन्काउंटर चौकशीसाठी समिती स्थापन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४ बदलापूर–** बदलापुरात दोन शाळकरी मुलींवर अत्याचार करणारा नराधम अक्षय शिंदेला (२३) पोलिसांनी सोमवारी कंठस्नान घातले. तळोजा कारागृहातून सोमवारी त्याला बदलापूर येथे घेऊन जात असताना त्याने एका पोलिस अधिकाऱ्याची बंदूक हिसकावत दोन ते तीन गोळ्या झाडल्या. अचानक झालेल्या या हल्ल्यानंतर पथकातील दुसऱ्या पोलिसाने अक्षयवर गोळ्या झाडल्या. यात तो गंभीर जखमी झाला. त्याला तत्काळ कळवा येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिथे अक्षयचा मृत्यू झाला. बदलापूरच्या आदर्श शाळेतील सफाई कामगार अक्षय शिंदेने १२ आणि १३ ऑगस्ट रोजी दोन मुलींवर अत्याचार केले होते. ही घटना उघडकीस आल्यानंतर १७ ऑगस्ट रोजी त्याला अटक करण्यात आली होती. अक्षयच्या पहिल्या पत्नीने दाखल केलेल्या नव्या गुन्ह्यात त्याला अटक करण्यासाठी ठाणे गुन्हे शाखेचे पोलिस तळोजा कारागृहात गेले होते. सायंकाळी ६ ते ६.१५ वाजेच्या सुमारास पोलिस व्हॅन मुंब्रा बायपासजवळ येताच अक्षय शिंदेने सहायक पोलिस निरीक्षक नीलेश मोरे यांचे सर्व्हिस रिव्हॉल्व्हर हिसकावले आणि त्यांच्या दिशेने जवळपास ३ गोळ्या झाडल्या. यातील एक



गोळी नीलेश मोरे यांच्या डाव्या मांडीला लागली. इतर २ गोळ्या बाजूने निघून गेल्या. तत्काळ दुसऱ्या पोलिस अधिकाऱ्याने स्वसंरक्षणार्थ गोळीबार केला. यात अक्षय गंभीर जखमी झाला. त्याला तत्काळ कळवा येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिथे उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. दरम्यान, एन्काउंटर संशयास्पद असल्याचा आरोप विरोधकांनी केल्यानंतर राज्य सरकारने चौकशी करण्यासाठी एसआयटी स्थापन करण्याची घोषणा केली आहे.

**बदलापुरात आनंदोत्सव**

आरोपी अक्षय शिंदेचे एन्काउंटर झाल्यानंतर बदलापूरकरांत जल्लोष साजरा झाला. शहरात बदलापूरकरांनी फटाके फोडून आनंद साजरा केला. विशेषत: महिलांनी एकमेकींना पेढे भरवून, मिठाई वाटून आनंद व्यक्त केला.

### मुंबईत ३३ वर्षांपूर्वीही नराधमाचे एन्काउंटर


आग्रीपाडा भागात बाली नांदिवडेकर आणि बाबा परमेश्वर यांनी १३ वर्षांच्या मुलीवर अत्याचार केला. आरोपी कलिना येथे येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. मात्र, पोलिसांना पाहताच ते एका अरुंद गल्लीत शिरले. पाठलाग करत असताना आरोपीने पोलिस पथकातील एकावर चॉपरने हल्ला केला. त्यानंतर मात्र पोलिसांनी बंदुकीतून गोळ्या झाडत ७ एप्रिल १९९१ रोजी बाबा आणि बालीला ठार केले.

# सामाजिक सुरक्षिततेची जबाबदारी केवळ पोलिस प्रशासनाचीच नाही, तर समाजाची सुद्धा: कुलगुरू डॉ. बारहाते यांचे प्रतिपादन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती–** सामाजिक सुरक्षिततेची जबाबदारी केवळ पोलिस प्रशासनाचीच नाही, तर समाजाची सुद्धा आहे, असे प्रतिपादन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी केले. महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या संयुक्त सहकार्याने विद्यापीठ परिसरातील दृकश्राव्य सभागृहात नुकतेच महिला सुरक्षितता व शिष्यवृत्ती या विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले होते. त्या प्रसंगी अध्यक्षीय भाषणातून ते मार्गदर्शन करत होते.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी सौरभ कटियार, अमरावती विभागाचे उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. सुबोध भांडारकर, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विकास विभागाच्या उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील उपस्थित होते.कुलगुरू डॉ. बारहाते म्हणाले, कार्यशाळेच्या माध्यमातून प्रत्येक कॉलेजच्या प्राचार्यांमार्फत महिला सुरक्षितता आणि शिष्यवृत्ती याची माहिती विद्यार्थिनींपर्यंत पोहोचेल तसेच जेंडर ऑडिट हा उपक्रम विद्यापीठाद्वारे प्रत्येक महाविद्यालयात राबवण्यात येणार असून, सामाजिक संघटनांच्या माध्यमातून आणखी या उपक्रमाला बळ देण्याचा प्रयत्न केला जाईल. यासोबत महिला सुरक्षिततेविषयी यापुढेही विद्यापीठाद्वारे उपक्रम राबवण्यात येतील, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. बारहाते यांनी दिली.



पोलिस आयुक्तालयाच्या वतीने फ्रेजरपुराचे सहायक पोलिस निरीक्षक रवींद्र सहारे यांनी महिलांसंबंधीच्या गुन्ह्यांविषयी माहिती देताना नवीन भारतीय दंड संहितेनुसार तपास यंत्रणेसह न्यायालयावरही बंधने आल्याचे सांगितले. राज्य महिला आयोगाविषयी सुद्धा त्यांनी सविस्तर माहिती दिली. सायबर पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक अनिकेत कासार यांनी सायबर गुन्ह्यांविषयी माहिती देताना ग्रुमिंग, बुलिंग, मॉर्फिंग, डिफेमेशन (बदनामी करणे), स्टॉकिंग (कॉल ब्लॉक केल्यावरही अन्य प्रकारे त्रास देणे), ऑनलाइन गेमिंग असे प्रकार सांगून सोशल इंजिनिअरिंग, फिशिंग (लिंक पाठवणे), व्हॉइस क्लोनिंग फ्रॉड, स्क्रीन शेअर फ्रॉड, इन्स्टंट लोन ॲप्स, फेक जॉब अलर्ट या गुन्ह्यांच्या प्रकाराबाबतही मार्गदर्शन केले.

उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. सुबोध भांडारकर यांनी विनाव्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी असलेले व व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थिनींना असलेल्या शुल्काविषयी माहिती दिली. महिलांच्या सुरक्षिततेसाठी असलेल्या विशाखा समिती तसेच कामाच्या ठिकाणी महिलांसाठीच्या असलेल्या कायद्याबाबतही त्यांनी माहिती दिली.

पहिल्या सत्रात रोल ऑफ प्रिन्सीपाल ऑन आयसीसी अंडर पोश ॲक्ट या विषयावर मार्गदर्शन करताना श्री शिवाजी विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. वर्षा देशमुख यांनी तक्रार निवारण समितीने अगदी डोळसपणे आणि नि:पक्षपणे चौकशी करणे अभिप्रेत असून प्रतिबंध, मनाई आणि उपाययोजना ही प्राचार्यांची जबाबदारी असल्याचेही प्रतिपादन केले. द्वितीय सत्रात अनिरुद्ध पाटील यांनी महिला सुरक्षिततेच्या बाबतीत माहिती दिली. शिष्यवृत्तीबाबत प्रभू दवणे यांनी सर्व विद्यार्थ्यांना कसा लाभ मिळू शकेल, यासाठी प्रयत्न होणे गरजेचे असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी केले, तर सूत्रसंचालन करून आभार विद्यार्थी विकास विभागाच्या उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील यांनी मानले. कार्यशाळेला विद्यापीठाशी संलग्न पाचही जिल्ह्यांतील महाविद्यालयांचे प्राचार्य, प्रतिनिधी उपस्थित होते.

# महावितरणला पुढील सात दिवसात करावे लागणार ८० कोटी वसूल

## पुनर्जोडणी शुल्क भरल्यानंतरच वीज पुरवठा होणार सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती,** ;वीज बिलाच्या थकबाकीत झालेली वाढ ही




महावितरणसाठी गंभीर बाब आहे.परिमंडलातील घरगुती,वाणिज्यिक,

औद्योगिक आणि इतर वर्गवारीतील ग्राहकाकडील ८० कोटी रूपयाच्या वीजबिलाच्या वसुलीसाठी महावितरणने वीजबिल वसुली मोहिम तीव्र केली आहे.थकबाकीमुळे खंडित झालेला वीज पुरवठा पुनर्जोडणी शुल्क भरल्याशिवाय सुरू केला जाणार नसल्याने ग्राहकांनी थकीत बिल भरून सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

परिमंडलाअंतर्गत अमरावती आणि यवतमाळ जिल्ह्यातील वीज बिलाची थकबाकी कमी होण्याऐवजी एप्रिल महिन्यानंतर त्यात सातत्याने वाढ होत आहे. त्यामुळे वीजबिल वसुली मोहिम तीव्र करून थकबाकी न भरणाऱ्या ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित करण्यात येत आहे. याशिवाय खंडित करण्यात आलेल्या वीज पुरवठ्याची नोंद तत्काळ ऑनलाईन प्रणालीत करण्याचे बंधन असल्याने, संपूर्ण थकबाकीसह सींगल फेज साठी ३१० आणि थ्री फेज साठी ५२० रूपयाचे पुनर्जोडणी शुल्क भरल्याशिवाय त्या ग्राहकाचा वीज पुरवठा सुरू करता येत नाही.

महिन्याचे शेवटचे सात दिवस बाकी असतांना घरगुती,वाणिज्यिक ,औद्योगिक आणि इतर वर्गवारीतील ग्राहकांडे परिमंडलाअंतर्गत अमरावती जिल्हात ४७ कोटी आणि यवतमाळ जिल्ह्यात ३३ कोटी रूपयाचे थकीत वीजबिल येणे बाकी आहे.

### शनिवार व रविवार सुरू राहणार विजबिल भरणा केंद्रे

महावितरणच्या वीजबिल वसुली मोहिमेत बिल न भरणाऱ्या ग्राहकाचा वीज पुरवठा खंडित करण्यात येत आहे.ग्राहकाची गैरसोय होऊ नये आणि महावितरणची वीज पुरवठा खंडित करण्याची कटू कारवाई टाळता यावी यासाठी महावितरणची अधिकृत वीजबिल भरणा केंद्रे शनिवार व रविवार या सुट्टीच्या दिवशी कार्यालयीन वेळेत सुरू ठेवण्यात येणार आहे.याशिवाय ग्राहक ऑनलाईन पध्दतीने महावितरण संकेतस्थळ,मोबाईल एप इत्यादी पध्दतीने वीज बिलाचा भरणा करण्याची सोय आहे

# नांदगाव तालुक्यातील शेकडो लाभार्थी मोदी आवास योजनेच्या अनुदानापासून वंचित

## शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वात लाभार्थ्यांची पंचायत समितीत धडक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४ नांदगांव खंडेश्वर–** तालुक्यात मोदी आवास योजना ग्रामीण अंतर्गत शेकडो पात्र लाभार्थ्यांनि घरकुलाचे काम पूर्ण करून सुद्धा आठ महिन्यापासून अनुदान मिळत नसल्याने लाभार्थ्यांनि शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वात पंचायत समिती कार्यालयात धडक देऊन सात दिवसांत निधी न मिळाल्यास राहुटी आंदोलन छेडण्याचा इशारा दिला नांदगांव तालुक्यातील पापळ वाढोना वेणी गणेशपूर सालोड मांजरी म्हसला माहुली चोर मंगरूळ चवाळा सातरगाव कंझरा शिवणी लोणी वाघोडा इत्यादी गावातील लाभार्थ्यांना मोदी आवास योजना ग्रामीण अंतर्गत प्रथम हप्त्याचे अनुदान देण्यात आले त्यानुसार लाभार्थ्यांनि घरकुलाचे बांधकाम सुरू करून आठ महिन्याचा कालावधी होत असताना अनुदान न मिळाल्याने उर्वरित कामा मुळे घरकुलाचे काम अर्धवट राहिले असून लाभार्थ्यांना भाड्याच्या घरात राहावे लागत आहे तर अनेक लाभार्थ्यांनि उसनवारी करून संपूर्ण घरकुलाचे बांधकाम केले मात्र अनुदान न दिल्याने उसनवारी व्यजासह चुकवावी लागत आहे त्यामुळे लाभार्थी हतबल झाले असून शेकडो लाभार्थ्यांनि पंचायत समिती कार्यलयात गटविकास अधिकारी यांना घेराव करून सात दिवसात सदर योजनेचा उर्वरित निधी द्यावा अन्यथा राहुटी आंदोलन छेडण्याचा इशारा दिला यावेळी शिवसेनेचे प्रकाश मारोटकर बाजार समितीचे संचालक विजय अजबले सरपंच लाभार्थी मारोती गवड्गे जयवताबाई रोहणेकर योगेश्वर चोरे अनिल गाडगे राहुल बोदडे अनिल डाखोरे गणेश सोळंके जीजाबाई ठाकरे सुधाकर कोपरे गणेश राऊत पंढरी बोदडे हरिदास काळसरपे हरिभाऊ येवतकर इत्यादी लाभार्थी उपस्थित होतेतालुक्यातील मोदी आवास योजनेचे विहीर अनुदानाचे गोठा अनुदान पंतप्रधान घरकुल योजना इत्यादी योजनेचे पैसे या सरकारने थांबविले असून सर्व पैसे लाडकी बहीण योजनेवर ट्रान्स्फर केले मात्र हा ग्रामीण लाभार्थी अनेक योजनेच्या अनुदाना पासून वंचित आहे सात दिवसांत अनुदान न दिल्यास राहुटी आंदोलन करू असा इशारा शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांनी दिला

# शेतकऱ्यांसह संत्रा उत्पादकांना हेक्टरी एक लाखांची मदत घोषित करा

## शेतकरी न्याय हक्क विचार मंच ची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४ तिवसा–** सततच्या पावसाने संत्रा पिकाचे झालेल्या नुकसानीचे सर्वेक्षण करून हेक्टरी संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना एक लाख रुपयांपर्यंत मदत देण्यात यावी, या मागणीसाठी शेतकरी न्याय हक्क विचार मंचचे दिनेश वानखडे यांच्या नेतृत्वात शेकडो संत्रा उत्पादक शेतकऱ्यासमवेत सोमवारी तिवसा तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.



तिवसा तालुक्यातील अनेक भागात रविवारी (दि. २२) झालेल्या वादळी पावसाने शेतकऱ्यांच्या शेतातील संत्रा, सोयाबीन, कपाशी, तूर यासह इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे तालुक्यातील शेतकरी हवालदिल झाले आहेत. या नुकसानीचे तालुका प्रशासनाने सर्वेक्षण करून नुकसान भरपाई द्यावी, अन्यथा शेतकरी हक्क विचार मंचच्या नेतृत्वात तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला. निवेदन देताना शेतकरी दिनेश वानखडे, दिनकर सुंदरकर, अशोक दरणे, जय बोके आदींसह अनेक शेतकरी या वेळी उपस्थित होते.

# आरटीओ कर्मचारी आजपासून संपावर

## आकृतीबंध अंमलबजावणीची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४ अमरावती –** आकृतीबंधाचा अंमलबजावणीसह महसुल स्तरावरील बदल्या रद्द करण्याच्या मागणीसाठी मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेने मंगळवारपासून बेमुदत संपाची हाक दिली आहे. या संपामुळे प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) येथील कामकाज प्रभावित होण्याची शक्यता आहे.

मोटर वाहन विभाग कर्मचारी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अनिल मानकर यांनी सांगितले, मोटार वाहन विभागासाठी शासनाने सुधारीत आकृतीबंध २३ सप्टेंबर २०२२ पासून लागू केले. परंतू त्याची अंमलबजावणी न केल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती रखडल्या. आकृतीबंधाची योग्य अंमलबजावणी न करता त्याचा आधार घेऊन महसूल विभागस्तरावर बदल्या करण्याची सुत्र शासनाने स्विकारली आहेत.




त्यामुळे ३१ ऑगस्ट २०२४ रोजी महसूलस्तरावर बदल्या करण्यात आल्या. या बदल्या मान्य नसल्याने कर्मचाऱ्यांनी न्यायालयात (मॅट) दाद मागून त्यावर स्थगिती आदेश पारीत केला आहे.

आकृतीबंधाच्या अंमलबजावणीस टाळाटाळ होत असल्यामुळे व महसूल विभागीय बदल्यांचे धोरण रद्द करण्याच्या मागणीसाठी मोटार वाहन विभागातील कर्मचारी २४ सप्टेंबर २०२४ पासून बेमुदत संपावर जात आहे. या संदर्भातील निवेदन वरिष्ठांना देण्यात आले आहे.आरटीओ कार्यालयातील चतुर्थ व तृतीय श्रेणीतील शेकडो कर्मचारी या बेमुदत संपात सहभागी होणार आहे. त्यामुळे वाहन नोंदणीपासून ते लायसन्सची सर्व कामे प्रभावित झाल्याचे दिसून येत होते.

# स्वयंपाकी पदासाठी मुख्याध्यापकाने दोन लाख उकळले; महिलेकडून तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**नांदगाव खंडेश्वर :** तालुक्यातील मंगरूळ चव्हाळा येथील 'प्रश्नचिन्ह' आश्रमशाळेत स्वयंपाकी पदावर नोकरी लावून देण्यासाठी तत्कालीन मुख्याध्यापकाने दोन लाख रुपये उकळले. त्याने एकूण सात लाखांची मागणी केली होती, अशी तक्रार मंगरूळ चव्हाळा पोलिस ठाण्यात महिलेकडून नोंदविण्यात आली. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

पोलिस सूत्रांनुसार, वहिता नूरदास भोसले (२९, रा. पारधी बेडा, मंगरूळ चव्हाळा) असे तक्रारदाराचे, तर प्रशांत बबन गोरामण (३२) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या तत्कालीन मुख्याध्यापकाचे नाव आहे. १ सप्टेंबर २०२२ रोजी वहिता भोसले यांना मुख्याध्यापक प्रशांत गोरामण याने सात लाखांची मागणी करीत स्वयंपाकी पदावर नोकरी देण्याचे आमिष दाखविले. ही प्रचंड मोठी रक्कम असल्याने ती देऊ शकत नाही, असे म्हणताच त्याने तूर्तास दोन लाख रुपये दे , असे सांगितले. उर्वरित पाच लाख रुपये या पदाचे ॲप्रूव्हल आल्यानंतर पगारातून कापले जातील, असे स्पष्ट केले. वहिताने दोन लाख रुपये दिल्यानंतर तिला शाळेच्या लेटर पॅडवर नियुक्तिपत्र मिळाले. तिने या पदावर कामदेखील केले.

# स्वाक्षरी मोहीम .....



सामान्य नागरीकांवर महापालिकेच्या वतीने लावण्यात आलेला भरमसाठ वाढीव मालमत्ता कर वाढीच्या निषेधार्थ व्यवस्था परिवर्तन प्रजासत्ताक नागरीक कृती समिती व्दारा आज राजकमल चौक येथे स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली. यावेळी नागरिकांनी उस्फुर्तपणे यात सहभाग घेत स्वाक्षरी नोंदवली.

# तहसील कार्यालय अतिक्रमणाच्या विळख्यात

## रस्त्यावरील खोके हटवण्याची व्यावसायिकांची मागणी उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ अचलपूर**

अचलपूर येथील तहसील कार्यालय अतिक्रमणाच्या विळख्यात सापडले असून रस्त्यावर असलेल्या खोक्यांमुळे वाहनधारकांना जाणे येणे मुश्किल झाले आहे शिवाय पार्किंगचा ही प्रश्न निर्माण झाला आहे यासंदर्भात तेथील व्यावसायिकांनी उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देऊन आठ दिवस उलटले तरी अद्याप कुठलेही कारवाई करण्यात आलेली नाही रस्त्यावरील अतिक्रमित टिनाचे खोके त्वरीत हटवावे अशी मागणी केली आहे तहसील कार्यालयाजवळ विविध व्यवसाय करणाऱ्या लोकांनी उपविभागीय अधिकाऱ्यांना दिलेले



लेखी निवेदन असे की तालुक्यातून तहसील कार्यालय अचलपूर येथे खेरदी विक्री नोंदणी करणारे नागरिक तहसील कार्यालय अचलपूर येथे आपल्या कामकाजासाठी येत असतात तहसील कार्यालयाच्या मागील बायपास रोडवर अवैध व्यवसायकांनी टीनाचे खोके ठेवल्याने रहदारीचा रस्ता अरुंद झाला आहे त्यामुळे तेथून ये जा करणाऱ्या वाहनधारकांना आपले वाहन चालवणे मुश्किल झाले आहे त्यांना अनेक अडथळे पार करत रस्ता पार करावा लागत आहे तसेच उपजिल्हा रुग्णालयाकडे जाणारा हा रस्ता जाणाऱ्या रुग्णवाहिकेला अडथळा निर्माण होत असतो रुग्णवाहकांना तात्काळ जाता येत नाही त्यामुळे गंभिर दुखापत जाणाऱ्या रुग्णाचा जीवही जाऊ शकतो अवैध टिन व्यावसायिकाचे खोके रोडवरच कामानिमित्त येणारे लोक रस्त्यावर उभे राहूनच आपले काम करत असल्याने त्यांच्या सुद्धा जीवाला धोका निर्माण झाला असेही दिलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे.

सदर निवेदनावर गोविंद चरपटे , श्याम शर्मा ,राहुल गाठे,अमित शहाकार, तळोकार यांच्यासह आदीं व्यावसायिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# स्वामी समर्थ सेवा केंद्र रहाटगाव येथेभागवत कथेचे आयोजन; जीवनात सत्याचे मूल्य जाणावे - जय नारायण शास्त्री महाराज



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ अमरावती**

जेव्हा आपण सत्याला महत्त्व देतो आणि त्याचे समर्थन करतो, तेव्हा आम्ही आमच्या संस्था आणि समुदायांमध्ये पारदर्शकता, जबाबदारी आणि न्यायाला प्रोत्साहन देतो. एकंदरीत, आपल्या वैयक्तिक ,नातेसंबंध, निर्णयक्षमता, मूल्ये आणि समाज यामध्ये सत्य महत्त्वाची भूमिका बजावते. परिपूर्ण आणि अर्थपूर्ण जीवन जगण्यासाठी ते आवश्यक आहे. असे वक्तव्य भागवत कथा वाचक जय नारायण शास्त्री महाराजयांनी केले आहे. कपटी कारस्थान करून क्षणाचा आनंद मिळत असला तरी ती एक अधोगती आहे, सत्य, चित आणि आनंद म्हणजे सचितानंद होय. जीवन मे सत्य नही है तो उसका कोई अर्थ नही है..जीवनात सत्याचे मूल्य जाणले पाहिजे असे देखील त्यांनी बोलताना सांगितले.श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र रहाटगाव येथे भागवत कथेत परमपूज्य श्री जय नारायण शास्त्रीजी महाराज यांनी भावीकांना मार्गदर्शन करताना वक्तव्य केले.

नैमिश्यारण्य धाम व्यासांची गादी असलेले नैमिश्यारण्य ही ऋषीमुनींची तपश्चर्या भूमी आहे याच ठिकाणी महर्षी व्यासांनी गणपती कडून महाभारत नैमिश्यारण्य येथून लिहून घेतले या पवित्र क्षेत्रातील कथावाचक यांच्या सुमधुरवाणीतून पितृ मोक्षाच्या पर्वावर भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. या भागवत कथेचे पूजन माजी राज्यमंत्री वसुधा ताई देशमुख यांचे हस्ते करण्यात आले.

# मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेचा पात्र ज्येष्ठ नागरिकांनी लाभ घ्यावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ अमरावती**

देशात हिंदू धर्मात चारधाम यात्रा, माता वैष्णोदेवी यात्रा, अमरनाथ यात्रा तसेच इतर धर्मियांचीही अनेक तीर्थस्थळे आहेत. जेथे आयुष्यात एकदा तरी जाण्याचे बहुतांश ज्येष्ठ नागरिकांचे स्वप्न असते. पुण्यकर्म म्हणून तीर्थक्षेत्री जाण्याची ज्येष्ठांची सुप्त इच्छा असते. परंतु गोरगरीब, सर्वसामान्य कुटुंबातील ज्येष्ठ नागरिक त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे, कोणी सोबत नसल्याने आणि पुरेशी माहिती नसल्याने त्यांचे तीर्थयात्रा करण्याचे स्वप्न पूर्ण होत नाही. ही बाब विचारात घेऊन यासाठी राज्यातील सर्व धर्मातील ज्येष्ठ नागरिक जे साठ वर्ष किंवा



त्याहून अधिक वयाचे आहेत, त्यांना राज्य आणि भारतातील तीर्थक्षेत्रांना मोफत भेटीची दर्शनाची संधी देण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना' राज्यात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने सुरू करण्यात आलेली आहे.

**या योजनेचे लाभार्थी पात्रता निकष**

लाभार्थी हा महाराष्ट्र राज्याच्या रहिवासी असणे आवश्यक आहे. वय वर्षे ६० व त्यावरील जेष्ठ नागरिक, लाभार्थ्याच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम दोन लाख पन्नास लाखापेक्षा जास्त नसावे. सदर योजनेचा लाभ मिळण्यासाठी पुढीलप्रमाणे कागदपत्रे आवश्यक आहेत. योजनेच्या लाभासाठी ऑनलाईन अथवा ऑफलाईन अर्ज, लाभार्थ्यांचे आधार कार्ड किंवा रेशन कार्ड, महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्यातील जन्म दाखला त्या व्यतिरिक्त लाभार्थ्यांचे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर त्या ऐवजी लाभार्थ्यांचे १५ वर्षापूर्वीचे रेशन कार्ड, मतदान ओळखपत्र, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, जन्म दाखला या चार पैकी कोणतीही ओळखपत्र प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल. सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुटुंबप्रमुखाचा उत्पन्नाचा दाखला, वार्षिक उत्पन्न दोन लाख पन्नास लाखापर्यंत असणे अनिवार्य किंवा पिवळे अथवा केशरी रेशन कार्ड ग्राह्य धरले जाईल. लाभार्थ्यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र, पासपोर्ट आकाराचा फोटो, जवळच्या नातेवाईकाचा मोबाईल क्रमांक व त्यांचे प्रमाणपत्र, तसेच सदर योजनेच्या अटी व शर्तीचे पालन करण्याबाबतचे लाभार्थ्यांचे हमीपत्र व नातेवाईकांची हमीपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील ६० वर्षावरील जेष्ठ नागरीकांनी परीपूर्ण अर्ज भरुन तालुका स्तरावर तहसिल कार्यालय, पंचायत समिती तसेच जिल्हास्तरावर सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाकडे सादर करावे. तसेच ज्या लाभार्थ्यांनी या आधी अर्ज भरलेले आहेत, त्यांनी सुधारित अर्ज भरण्यासाठी व अर्जामधील त्रुटी पूर्ण करण्यासाठी समाज कल्याण कार्यालयाशी संपर्क साधावा. जेणे करुन सर्वांचे अर्ज पात्र करता येतील, असे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त राजेंद्र जाधवर यांनी केले.

# महिला महाविद्यालय येथे आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रा अंतर्गत उद्घाटन समारंभ संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ अमरावती**

कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग यांच्या वतीनेशुक्रवार दिनांक २० सप्टेंबर २०२४ रोजी महाराष्ट्रातील एक हजार महाविद्यालयांमध्ये स्थापित आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे दूरदृश्य प्रणालीद्वारे उद्घाटनपर शुभारंभ कार्यक्रम माननीय प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते वर्धा येथून आयोजित करण्यात आला होता.ऑनलाइन प्रणालीद्वारे संपन्न झालेल्या या कार्यक्रमांमध्ये महिला महाविद्यालय देखील सहभागी झाले होते. महिला महाविद्यालयामध्ये स्थापित आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राच्या महाविद्यालयीन स्तरावर व ऑनलाईन उद्घाटनपर कार्यक्रमा करिता नूतन विदर्भ शिक्षण मंडळाचे सचिव.निनाद सोमण , सहसचिव प्रा. ममता पांडे ,प्राचार्य डॉ.अविनाश मोहरील, न्यू हायस्कूल मेन शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. जदबंसी , नूतन कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ .जयश्री पांडे, नगरसेवक अजय सारसकर, तसेच कौशल्य विकास केंद्राच्या स्किल डेव्हलपमेंट ऑफिसर सौ. पवार मॅडम विशेष करून उपस्थित होत्या.

महिला महाविद्यालय येथे या कौशल्य विकास केंद्रांतर्गत



तीन कोर्सेस राबविण्यात येणार असून महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने उचललेले हे महत्त्वाचे पाऊल होय, असे प्रा. ममता पांडे यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये सांगितले. प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील यांनी नूतन विदर्भ शिक्षण मंडळ ही संस्था नेहमीच विद्यार्थिनींच्या तसेच महिला सक्षमीकरणात महत्त्वाचा वाटा उचलणारी संस्था म्हणून ओळखली जाते. त्या अनुषंगाने महिला महाविद्यालयातील विद्यार्थिनी विविध कौशल्यात पारंगत होऊन स्वतःच्या पायावर उभे राहू शकतील असे रोजगाराभिमुख कोर्सेस या केंद्रांतर्गत चालविण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. यामध्ये प्रामुख्याने किचन स्टुअर्ट ,ऑडिटिंग आणि जिम ट्रेनर असे तीन कोर्सेस राबविण्यात येणार आहेत. प्रमुख अतिथी सौ .पवार मॅडम यांनी कौशल्य विकास केंद्रांतर्गत राबविण्यात येणारे विविध कोर्सेस तसेच त्याची कार्यपद्धती याबद्दल सविस्तर माहिती सांगितली. १४ ते ४५ वर्षे वयोगटातील सर्व स्त्रिया हा कौशल्याधिष्ठित कोर्स करून स्वयंरोजगार मिळू शकतात .या नवीन उपक्रमाकरिता संस्थेच्या अध्यक्षा डॉ. मायाताई शिराळकर, सचिव श्री. निनाद सोमण, तसेच संपूर्ण कार्यकारणी मंडळ यांनी शुभेच्छा दिल्या तसेच संस्था सदैव अशा नवीनतम उपक्रमांसाठी महाविद्यालयाच्या पाठीशी राहिल याची ग्वाही दिली. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन प्रा. प्रवीण गुल्हाने यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता पर्यवेक्षिका प्रा. सोनपरोते, प्रा. वळसे प्रा.सोवळे, प्रा. व्यास, प्रा.तीनखेडे ,प्रा. पोकळे , प्रा. विवेक जोशी , स्वप्निल जोशी, प्रा.गीरी, प्रा.देशमुख यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी तसेच प्राध्यापक वृंद उपस्थित होते.

# अवैध गौण खनिज पथकव्दारे धडक कार्यवाही; अवैध गौण खनिज करणारा ट्रक पकडला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४भातकुली**

आज दिनांक २३ सप्टेंबर रोजी सकाळी साडेपाच वाजता च्या दरम्यान मा.तहसिलदार भातकुली अजित कुमार येळे यांनी दिलेल्या निर्देश अन्वये भातकूली तालुका अंतर्गत अवैध गौण खनिज पथकाव्दारे तालुक्यातील हातूर्णा येथील पेढी



नदीपात्रातून होत असलेले अवैध गौण खनिज वाहतूक पकडण्यात आला.पकडण्यात आलेले वाहन क्रमांक चक १९ -ग ०३२६ , गाडी मालक चे नाव रमेश हरीचंद्र बगल्ले राहणार हातूर्णातहसिलदार अजित कुमार पेढे यांच्या मार्गदर्शनात कृष्णा गाडेकर नायब तहसीलदार मंडल अधिकारी रमेश धावणे तलाठी संगीता वाघमारे,एस.एस.गील, स्मिता बैलमारे, किशोर जाधव, वर्षा वानखेडे, भातकूली पोलिस च्या मदतीने तहसील कार्यालय भातकुली येते पुढील कार्यवाही करण्यास डीटेन करण्यात आले आहे.

# कोतवालांना चतुर्थ श्रेणीत सामावून घ्या कोतवाल संघटनेचे काम बंद आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४तिवसा**

तिवसा तालुक्यातील कोतवाल संघटने कडून काम बंद आंदोलना चे निवेदन सोमवार(दि.२३)तहसील प्रशासनास देण्यात आले आहे.राज्यस्तरीय कोतवालांना चतुर्थ श्रेणीचा दर्जा मिळावा व इतर प्रलंबित मागण्यासाठी तिवसा तालुक्यातील कोतवाल संघटनेने प्रशासनास निवेदन देऊन सोमवार पासून कामबंद आंदोलन सुरु केल्याचे कळविले आहे.दि.२४ संप्टेंबर पासून राज्यभर काम बंद आणि दि.२६ संप्टेंबर पासून आझाद मैदान मुंबई येथे मागण्या पूर्ण होई पर्यंत काम बंद आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.तिवसा तालुका कोतवाल संघटनेचे तालुका अध्यक्ष रवींद्र शाम भारती,तालुका उपाध्यक्ष मीनाक्षी महल्ले,सचिव राजेंद्र सपाटे व इतर कोतवाल उपस्थित होते.

# सात सहकारी संस्थांच्या निवडणुकीची लगबग30 सप्टेंबरची डेडलाईं : आदेशाची प्रतीक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ अमरावती**

पावसाळ्यामुळे निवडणूक प्रक्रिया बाधित होण्याची शक्यता गृहीत धरता जिल्ह्यातील सात सहकारी संस्थांच्या निवडणुकीला ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. आता मुदत संपुष्टात येत असल्याने इच्छुकांसह सहकार विभागाला राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणाच्या आदेशाची प्रतीक्षा आहे.

जिल्ह्यातील 'ब' वर्गीय सात सहकारी संस्थांच्या व्यवस्थापक समितीचा कालावधी संपुष्टात येत असल्याने जिल्हा उपनिबंधक कार्यालयाद्वारा निवडणूक प्रक्रिया आरंभली होती. यामध्ये मतदार यादीचा कार्यक्रम पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष निवडणुकीची प्रक्रिया सुरू करण्यात येणार होती. यामध्ये १३ जूनपासून उमेदवारी अर्ज पुरविणे व दाखल करण्याचा कालावधी होता. याच प्रक्रियेत २१ जुलै रोजी मतदान होणार होते. दरम्यान, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे १२ जूनच्या आदेशान्वये निवडणूक प्रक्रिया आहे. त्या टप्प्यावरून पुढे ढकलण्यात आली होती.



शेतकरी खरीप हंगामात व्यस्त राहत असल्याने सभासद शेतकऱ्यांना निवडणुकीमध्ये सहभाग घेण्यास अडचणी निर्माण होणार असल्याचे कारण प्राधिकरणाद्वारादेण्यात आले होते. त्यामुळे निवडणुकांना सुरू असलेल्या टप्प्यापासून मुदतवाढ देण्यात आली होती. आता ही मुदत संपत आहे. मात्र, त्याचदरम्यान विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता राहण्याची शक्यता असल्याने पुन्हा निवडणूक प्रक्रिया बाधित होते का? याकडे सहकार विभागाचे लक्ष लागले आहे.

**निवडणूकपात्र सहकारी संस्था**

सेवा सहकारी संस्था सावंगा, कावली व शिवणी तसेच अमरावती विभाग अर्बन को-ऑप. बँक्स असोशिएशन, भारतीय सॅलरी ओनर्स को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, सम्यक कृषी प्रक्रिया पणन व निर्यातदार मागासवर्गीय सहकारी संस्था, वाघोली, श्री गजानन महाराज शेतमाल उत्पादक प्रक्रिया व पणन सहकारी संस्था, चांदूर बाजार या सहकारी संस्थांचा या निवडणूक प्रक्रियेत सहभाग होता.

# दोन दिवस मनसे अध्यक्ष राज ठाकरे अमरावतीत

## मनसेचे मिशन विदर्भ ११ जिल्हयातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक अमरावतीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ अमरावती**

आगामी विधानसभा निवडणूकीच्या दृष्टीने मनसे अध्यक्ष राज ठाकरे जोमानेतयारीला लागले आहेत. गत ऑगस्ट महिन्यात मराठवाडा आणि विदर्भाच्या प्रत्येक जिल्हयात पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेतल्यानंतर एका महिन्यातच पुन्हा गणेशउत्सवानंतर राज ठाकरे हे अमरावती दौऱ्यावर येत असून विदर्भातील ११ जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांना अमरावती येथे बोलाविण्यात आले आहे. दि. २७ सप्टेंबर शुक्रवार रोजी पश्चिम विदर्भातील अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ तर दि. २८ सप्टेंबर शनिवार रोजी पुर्व विदर्भातील वर्धा, नागपूर, भंडारा,



गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांच्य बैठका राज ठाकरे स्वतः हॉटेल ग्रॅन्ड मेहफिल इन अमरावती येथे घेणार आहे. विधानसभेच्या दृष्टीने विदर्भात राज ठाकरे यांनी विशेष ताकद लावण्याचे ठरविले असून अमरावती हे केंद्रबिंदु असल्याचे अमरावतीच्या राजकीय वर्तुळात चर्चेला नक्कीच उधान आलेले आहे. अमरावती शहर व जिल्ह्याच्या वतीने या संपूर्ण विदर्भातील बैठकीच्या आयोजनाकरीता मनसेचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वतीने जोमाने प्रयत्न सुरु आहे. दि. २७ सप्टेंबर शुक्रवार रोजी अमरावती रेल्वे स्टेशनवर सकाळी ७.३० वाजता राज ठाकरे यांचे जंगी स्वागत केल्या जाणार आहे. अशी माहिती मनसे अमरावती शहराध्यक्ष धिरज तायडे व बडनेरा शहराध्यक्ष गौरव बांते यांच्यावतीने मिळालेली आहे.

# काँग्रेस नेत्या रश्मी बर्वे यांचे जात वैधता प्रमाणपत्र रद्द करण्याचा निर्णय अवैध

## हायकोर्टाचा मोठा निर्णय : पडताळणी समितीला एक लाखाचा दंडही ठोठावला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ नागपूर**

काँग्रेस नेत्या रश्मी बर्वे यांचे चांभार अनुसूचित जातीचे वैधता प्रमाणपत्र रद्द करण्याचा पडताळणी समितीचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने मंगळवारी अवैध ठरवला आणि बर्वे यांना तातडीने जात वैधता प्रमाणपत्र जारी करा, असा आदेश समितीला दिला. तसेच, बेकायदेशीर कृती केल्यामुळे समितीवर एक लाख रुपये दंडही ठोठावला.




न्यायमूर्तिद्वय अविनाश घरोटे व मुकुलिका जवळकर यांनी बर्वे यांना हा मोठा दिलासा दिला. न्यायालयाने गेल्या ९ मे रोजी या प्रकरणावरचा निर्णय राखून ठेवला होता. पारशिवनी तालुक्यातील गोडेगाव टेकाडी येथील वैशाली देवीया यांनी बर्वे यांच्या जात वैधता प्रमाणपत्राविरुद्ध जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे तक्रार केली होती. समितीने त्या तक्रारीची दखल घेऊन गेल्या २८ मार्च रोजी बर्वे यांचे जात वैधता प्रमाणपत्र रद्द केले. त्यानंतर २ एप्रिल रोजी विभागीय आयुक्तांनी या आदेशाच्या आधारावर त्यांचे जिल्हा परिषद सदस्यत्व रद्द केले. काँग्रेसने लोकसभा निवडणुकीसाठी रश्मी बर्वे यांना अनुसूचित जातीकरिता आरक्षित रामटेक मतदारसंघातून उमेदवारी दिली होती. परंतु, जात वैधता प्रमाणपत्र रद्द झाल्यामुळे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांचे लोकसभा निवडणुकीचे नामनिर्देशनपत्र रद्द केले. त्यामुळे त्यांना लोकसभा निवडणूक लढता आली नाही. नामनिर्देशनपत्र कायम ठेवण्यासाठी त्यांनी सर्वोच्च न्यायालयापर्यंत धाव घेतली होती, पण त्यांची मागणी मान्य झाली नाही. परंतु, आता त्यांचे जिल्हा परिषद सदस्यत्व बहाल होईल. बर्वे यांच्यातर्फे ॲड. शैलेश नारनवरे व ॲड. समीर सोनवने, सरकारतर्फे महाधिवक्ता ॲड. बिरेंद्र सराफ व मुख्य सरकारी वकील ॲड. देवेंद्र चव्हाण तर, प्रथम तक्रारकर्ते सुनील साळवेतर्फे ॲड. मोहित खजांची यांनी कामकाज पाहिले.

# दिवाळीत गावी जाण्यासाठी २०० पेक्षा जास्त वेटिंग; घरी जाणार कसं? रेल्वे फुल्ल अन् प्रवासी नाराज

## पुण्यातून जाणाऱ्या लांब पल्ल्याच्या अमरावती,नागपूर, गोरखपूर, दानापूर, झेलम, आझाद हिंद एक्स्प्रेस फुल्ल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ पुणे**

सणासुदीच्या काळात गावी जाण्याची प्रत्येकाला ओढ असते. ऐनवेळी अडचणी येऊ नयेत यासाठी प्रवासी आगाऊ रेल्वे तिकीट बुक करून ठेवतात. त्यात रेल्वेच्या गाड्या या १२० दिवस आधी बुकिंग करण्याची सुविधा आहे. त्यामुळे पुण्यातून जाणाऱ्या जवळपास ८० टक्के गाड्या सध्या 'वेटिंग'वर आहेत. त्यामुळे



आयत्या वेळी जाणाऱ्या प्रवाशांना आता दुसरा पर्याय शोधण्याची वेळ आली आहे.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर नोकरदार, व्यावसायिक व सुटीमुळे गावी जाण्याचे प्रवाशांचे नियोजन कोलमडत आहेत. रेल्वे गाड्यांना आरक्षण मिळत नसल्याने प्रवासी नाराज होत आहेत. यावेळी लोकमत प्रतिनिधीशी बोलताना प्रवाशांनी दिवाळीच्या दोन महिने आधीच रेल्वे फुल असल्याने रेल्वे प्रवासी हतबल झाले आहेत. यामुळे दिवाळीला लांब पल्ल्याच्या गावी कशाने जायचे, असा प्रश्न पडत आहे.

दिवाळी हा आनंदाचा आणि उत्साहाचा सण आहे. त्यामुळे गावी जाऊन सण साजरा करणाऱ्यांचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे या काळात एसटी, खासगी गाड्या या 'फुल्ल' असतात. त्यामुळे प्रवासी रेल्वेचे तिकीट आगाऊ बुक करून ठेवतात. पुण्यातून जाणाऱ्या लांब पल्ल्याच्या अमरावती,नागपूर, गोरखपूर, दानापूर, झेलम, आझाद हिंद एक्स्प्रेस व इतर प्रमुख गाड्यांना आतापासूनच वेटिंग सुरू झाले आहे. परिणामी, प्रवासात कोणत्याही प्रकारचा त्रास नको असेल, तर आताच इतर पर्याय शोधणे किंवा तिकीट बुक करून ठेवणे हे फायद्याचे ठरेल.

# उद्याला अमरावती जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांना कुलूप

## ग्रामीण भागातील हजारो शिक्षक जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार : विद्यार्थी हिताकरीता गावातील गुरुजींचा मोर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि..२४ अमरावती**

चुकीच्या धोरणामुळे जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होऊन ग्रामीण भागातील ज्ञानमंदिरे ओस पडू लागली आहेत.आता मात्र शिक्षकांनीच त्रिस्तरीय आंदोलन करण्याचा निर्धार केला आहे. यासाठी २५ सप्टेंबर रोजी अमरावती जिल्ह्यातील हजारो शिक्षक सामुदायिक रजा घेवूनजिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहेत.त्यामुळे जिल्हा परिषद शाळां बंद राहणार आहे.




सरकारने शिक्षक संच मान्यता व कंत्राटी शिक्षक भरती करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे ज्या जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांची पटसंख्या २० असेल अशा शाळांमध्ये एक कायम तर एक कंत्राटी शिक्षक नेमला जाणार आहे. मात्र या धोरणाने ग्रामीण शिक्षणाचा दर्जा वाढण्याऐवजी त्याचा अधिकच बट्ट्याबोळ उडणार आहे.असा आरोप शिक्षक संघटनांसह पालकांनी केला आहे. दुर्गम भागात विद्यार्थ्यांची संख्या आजही अधिक आहे, परंतु त्यांच्याकडे आधार नोंदणी नसल्याने याचा फटका शिक्षकांची पदे भरताना बसणार असून या निर्णयालाच शिक्षक संघटनेने विरोध केला आहे. याकरिता संपूर्ण राज्यात त्रिस्तरीय आंदोलन केले जाणार आहे. पहिल्या व दुसऱ्या टप्प्यात सर्वच शाळांमधील शिक्षक काळ्या फिती लावून काम करत असतानाच प्रशासनाच्या व्हॉट्सॲप ग्रुपवरूनदेखील एकाच वेळी बाहेर पडले आहेत. आता २५ सप्टेंबर रोजी तिसऱ्या टप्प्यात शाळांना टाळे ठोकून जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत आंदोलन करणार आहेत

शिक्षक संच मान्यता व कंत्राटी शिक्षक भरतीविरोधात आंदोलन करणाऱ्या शिक्षकांनी प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना वेळेत गणवेश व पुस्तके देण्यात यावीत अशी मागणी केली आहे. याबरोबरच दिलेल्या पुस्तकांमध्ये कोरी पाने न देता स्वतंत्र स्वाध्याय पुस्तिका द्यावी, शैक्षणिक व अशैक्षणिक कामांच्या शासन निर्णयात दुरुस्ती, शिक्षकांना मुख्यालयी निवासाची सक्ती रद्द करावी, आश्वासित प्रगती योजना लागू करावी, सर्व पदवीधर शिक्षकांना सरसकट वेतनश्रेणी, शालेय पोषण आहार योजना स्वतंत्र यंत्रणेकडे द्यावी तसेच विविध अभियान, उपक्रम, सप्ताह, बहि:शाल संस्थांच्या परीक्षा, वारंवार मागितली जाणारी ऑनलाइन माहिती यासारखी कामे थांबविण्यात यावीत अशा मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना दिले जाणार आहे.

# असाक्षर महिला व पुरूष साक्षर होण्यासाठी नवभारत साक्षरता कार्यक्रमात अमरावती जिल्हा अव्वल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि..२४ अमरावती**

समाजामध्ये आजही बरीचशी लोक आहेत की, ज्यांना अजूनही अक्षर ओळख झाली नाही. अशा असाक्षर महिला व पुरुष तसेच तरुणांना साक्षर करण्याचे कार्य शिक्षण संचालनालय (योजना ) या विभागाने हाती घेतले आहे. केंद्र पुरस्कृत 'उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रम' सन २०२२ ते सन २०२७ या कालावधीत वय वर्ष १५ व त्यापुढील असाक्षर असणाऱ्या व्यक्तींना साक्षर करण्यासाठी केंद्रामार्फत राज्याच्या मदतीने राबविण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने राज्यभर 'वारी साक्षरतेची' हा उपक्रम घेण्यात आला होता. श्री क्षेत्र पंढरपूर वारीमध्ये येणाऱ्या वारकऱ्यांची असाक्षरतेच्या नोंदी घेण्यात आल्या आहेत. यानिमित्ताने साक्षरतेचा संदेश देण्यात येत आहे. जिल्ह्यातही ज्या-ज्या ठिकाणी वारकरी मिळतील, त्या ठिकाणी जाऊन साक्षरतेच्या संदर्भात जनजागृती व वारकऱ्यांच्या भेटी घेण्यात आलेल्या आहेत.



शिक्षणाधिकारी (योजना) या कार्यालयामार्फत गणेशोत्सवाचे औचित्य साधून साक्षरतेचा प्रचार व प्रसार करण्यात आला आहे. सन २०३० पर्यंत शंभर टक्के साक्षर करण्याचा केंद्र सरकारचा मानस आहे. गावागावांमध्ये कार्यक्रम राबविण्यात संदर्भात पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील शिफारशीनुसार व संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत विकास ध्येयानुसार २०३० पर्यंत सर्व तरुण आणि प्रौढ पुरुष आणि स्त्रिया अशा सर्वांना शंभर टक्के साक्षरता आणि संख्याज्ञान संपादन करणे अपेक्षित आहे. शासन निर्णय दि. १४ ऑक्टोबर २०२२ अन्वये केंद्रशासन पुरस्कृत उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रम सन २०२२ ते सन २०२७ या कालावधीत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार राबविण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला आहे. या कार्यक्रमासाठी अंमलबजावणी यंत्रणा म्हणून शालेय शिक्षण व साक्षरता मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शिक्षण संचालनालय योजना, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, शिक्षणाधिकारी योजना, जिल्हा परिषद, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती या यंत्रणांमार्फत होत आहेत.

या कार्यासाठी महत्त्वाच्या समित्या स्थापन केल्या असून त्यामध्ये राज्यस्तर, जिल्हास्तर, गटस्तर व शाळास्तर अशा समित्या आहेत. जिल्हास्तर समितीसाठी नियामक परिषदचे जिल्हाधिकारी अध्यक्ष आहेत. 'प्रौढ शिक्षण' या ऐवजी 'सर्वांसाठी शिक्षण म्हणून हा उपक्रम राबविल्या जात आहे. शाळा हे या योजनेच्या अंमलबजावणीसाठीचे एकक आहे. लाभार्थी आणि स्वयंसेवक यांचे सर्वेक्षण शाळांकडून केले जाते. यामध्ये शासकीय अनुदानित खाजगी शाळांमधील शिक्षकांव्यतिरिक्त शिक्षक पदांचे शिक्षण घेणारे, उच्च शिक्षण संस्थामधील विद्यार्थी, पंचायतराज संस्था, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर तसेच एनएसएस, एनसीसी यांचाही स्वयंसेवक म्हणून सहभाग आहे. असाक्षरांची नोंद उल्लास प वर केली जाते. स्वयंसेविकामार्फत ऑफलाइन अध्यापन केले जाते.

पायाभूत साक्षरता (वाचन लेखन) व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी घेतली जाते. परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर साक्षरता प्रमाणपत्र दिले जाते. मागील शैक्षणिक सत्र २०२३-२४ मध्ये अमरावती जिल्ह्याची उल्लास पवर नोंदणी एकूण ३० हजार ५५६ इतके असाक्षर होते. त्यापैकी २५ हजार ५८२ इतके परीक्षेला बसले, त्यापैकी २५ हजार ३१६ इतके उत्तीर्ण झाले. सत्र २०२४-२५ साठी ११ हजार ५५६ इतके लाभार्थी आहेत. त्यांना साक्षरतेचे धडे देण्यात येतील. सध्या महाराष्ट्रात अमरावती जिल्हा अव्वल आहे.


# अमरावती, छत्रपती संभाजीनगरच्या ज्वारी खरेदी उद्दिष्टाला कात्री

## अकोल्यासह पाच जिल्ह्याचे उद्दिष्ट मात्र वाढविले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ अमरावती**

राज्यात रब्बी हंगाम २०२३-२४ मध्ये पणन महासंघाकडून ज्वारी खरेदी केली जात आहे. यामध्ये अमरावती व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात अपेक्षेप्रमाणे ज्वारी खरेदी झाली नसल्याने त्या जिल्ह्यांच्या उद्दिष्टांना कात्री लावली. ते उद्दिष्ट अकोल्यासह पाच जिल्ह्यांमध्ये विभागून देण्यात आले आहे.

अकोला जिल्ह्याला सर्वाधिक १५ हजार क्विंटलचे उद्दिष्ट वाढवून दिले. ३० सप्टेंबरपर्यंत ज्वारी खरेदीला पणन महासंघाने मुदतवाढही दिली आहे. आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत रब्बी पणन हंगाम २०२३-२४ मध्ये ज्वारी खरेदी करण्यासाठी पणन महासंघाची मुख्य अभिकर्ता संस्था म्हणून नेमणूक झाली. शासनाकडून ज्वारी खरेदीचे पणन महासंघास नऊ लाख पाच हजार क्विंटलचे उद्दिष्ट दिले. त्यानुसार जिल्हा विपणन अधिकाऱ्यांना शेतकरी नोंदणी व खरेदीच्या प्रमाणात ज्वारी खरेदीचे उद्दिष्ट विभागून देण्यात आले आहे. हंगामात ज्वारी खरेदीची अंतिम मुदत ३० सप्टेंबरपर्यंत असून मुदतीमध्ये नोंदणीकृत शेतकऱ्यांची ज्वारी खरेदी होणे आवश्यक आहे. त्यासाठी शासनाकडून प्राप्त उद्दिष्ट



११ जिल्ह्यांमध्ये विभागून देण्यात आलेले आहे. मात्र, अमरावती व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांत ज्वारी खरेदीला अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. उद्दिष्टपूर्ती होण्याच्या दृष्टीने दोन्ही जिल्ह्यांत ज्वारी खरेदी होत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे त्या जिल्ह्यांच्या विपणन अधिकाऱ्यांनी पणन महासंघाकडे उद्दिष्टपूर्ती होणार नसल्याचे कळवले. त्यानुसार अमरावती व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांचे शिल्लक ज्वारी खरेदीचे उद्दिष्ट अकोल्यासह पाच जिल्ह्यांमध्ये विभागून देण्यात आले आहे.

अमरावतीचे ३५ हजार, तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे अडीच हजार क्विंटल ज्वारी खरेदीचे उद्दिष्ट घटविण्यात आले. त्या ३७ हजार ५०० क्विंटल उद्दिष्टाची विभागणी पाच जिल्ह्यांमध्ये करण्यात आली. त्यामध्ये अकोला जिल्ह्याला सर्वाधिक १५ हजार क्विंटल, बुलढाणा जिल्ह्याला १२ हजार, वाशीम पाच हजार, यवतमाळ तीन हजार, तर अडीच हजार क्विंटल बीड जिल्ह्याचे उद्दिष्ट वाढवले आहे.

**७.९४ लाख क्विंटल ज्वारीची खरेदी**

राज्यात नऊ लाख पाच हजार क्विंटलचे ज्वारी खरेदीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. त्यापैकी आतापर्यंत ११ जिल्ह्यांमध्ये सात लाख ९४ हजार १६९.२६ क्विंटल ज्वारीची खरेदी पूर्ण करण्यात आली.